# ANAMPREM Newsletter

# अनामप्रेम स्नेहवार्ता

www.anamprem.org | मासिक पत्रिका जुलै - 2025

लोकमत

मस्ट READ

## ‘आम्हाला दया नको; संधी द्या’, अनामप्रेमच्या मुलांची साद

### दिव्यांगांना बळ देणारे घर; आत्मनिर्भरतेसाठी साथ

माणुसकीचे क्षितिज...

प्राची पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** ‘आम्हाला सहानुभूती, दया नको; संधी हवी आहे. स्वतःला घडवण्याची. आमच्यात जे व्यंग आहे त्यामुळे आम्ही कोणापेक्षा कमी आहोत असे अजिबात नाही’. अनामप्रेम या संस्थेतील दिव्यांग मुलांच्या या भावना आहेत. अनामप्रेम ही संस्था दिव्यांगांसाठी केवळ निवारा नाही, तर त्यांच्या स्वप्नांना आकार देणारे आश्रयस्थान आहे. त्यांच्या शिक्षण, विकास व आत्मनिर्भरतेच्या प्रवासात मार्गदर्शक ठरणारे हे घर, समाजाला नवा दृष्टिकोन देणारे आहे.



दिव्यांगांना नवदृष्टी देणारे घर ‘अनामप्रेम’मधील मुले. इन्सेटमध्ये ‘अनामप्रेम’ वसतिगृह.

अहिल्यानगर येथील डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या नेतृत्वात सुरू झालेली ३५ वर्षे जुनी संस्था स्नेहालय ही अनामप्रेमची मातृसंस्था. २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगरमध्येही अनामप्रेमची शाखा सुरू झाली. मराठवाड्यातील तळागाळातून आलेली अंध, दिव्यांग मुले संस्थेत राहून शिक्षण घेत आहेत. येथे त्यांना मोफत निवास, भोजन, वैद्यकीय, शैक्षणिक सुविधा मिळतात. त्यामुळे परिस्थितीमुळे शिकू न शकणारी मुले या ठिकाणी राहून आपली स्वप्ने साकार करण्यासाठी प्रयत्न करतात.

### नि:शुल्क निवासीव्यवस्था

अनामप्रेमच्या येथील शाखेचे प्रमुख जे. आर. मंत्री यांनी संस्थेच्या शहरातील सुरुवातीविषयी सांगितले. ते म्हणाले, ‘दिव्यांगांना स्वावलंबी बनवणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून संस्थेची सुरुवात झाली. मराठवाड्यातील दिव्यांग मुलांना शिक्षण घेताना अनेक अडचणी येतात. घरची हलाखीची परिस्थिती, पालकांमध्ये माहितीचा अभाव अशा अडचणी दिव्यांग मुलांच्या स्वावलंबनात बाधा ठरतात. योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले तर त्यांनाही उत्तम करिअर करता येईल’.

### समान वागणुकीची अपेक्षा

अनामप्रेमच्या मुलांशी संवाद साधला. ज्ञानेश्वर काकडे म्हणाला, ‘आमच्यासारख्या लोकांना समाज स्वीकारत नाही. आम्हाला रस्ता ओलांडताना तुमच्या मदतीची आवश्यकता असते. पण लोक हातावर पैसे ठेवून जातात. अशा वेळी वाईट वाटते’. देवानंद लांडगे, शंकर वाभळे म्हणाले, ‘आम्हाला आमच्या मेहनतीचे फळ मिळावे. शासन सगळ्याच दिव्यांगांना नोकऱ्या देऊ शकत नाही. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ज्या कंपन्या आहेत, त्यांनी दिव्यांगांना रोजगार द्यावा.

### संगणक कक्षासाठी प्रयत्नशील

अनामप्रेममध्ये १७ मुले वास्तव्यास आहेत. १२ वी, एम.ए, बी.ए., एमएसडब्ल्यू या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. कॉम्प्युटर कक्ष सुरू करण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. ज्यातून त्यांना रोजगार मिळणे सोपे होईल.







मुंबई येथील केशवसृष्टी प्रमुखांची अनामप्रेम छत्रपती संभाजीनगर प्रकल्पाला सदिच्छा भेट

## अनामप्रेम संस्थेतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयोजित MSCIT कोर्सचा निकाल 100% : उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक

**अनामप्रेम संस्थेच्या वतीने अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या MSCIT कोर्ससाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा 14 व 15 जुलै रोजी नगर येथील MSCIT सेंटरवर यशस्वीरित्या पार पडली. विशेष आनंदाची बाब म्हणजे MSCIT कोर्ससाठी प्रवेश घेतलेले सर्व 29 विद्यार्थी या कोर्समध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. MSCIT कोर्समध्ये 100% उत्तीर्ण निकालाची परंपरा यावर्षीही अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांनी कायम राखली.**



Scanned with OKEN Scanner

# JULY - Highlights

www.anamprem.org






29 जुलै रोजी शिरूर कासार (बीड) येथे जिल्हा समाज कल्याण विभाग व एलिम्को मुंबई यांच्या सहकार्याने दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी कृत्रिम साहित्य वाटप व पूर्वतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या वेळी अनामप्रेम संस्था व Youth4Jobs Foundation यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण, रोजगार व प्रशिक्षण मेळावाही घेण्यात आला.









FRST फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने अनामप्रेम संस्थेतील अंध विद्यार्थ्यांना विशेष सुरक्षा जॅकेट व रेनकोटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात फाउंडेशनच्या श्रीमती फराह नाज मॅडम व मा. फतेह रनधावा सर उपस्थित होते. त्यांनी अंध विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी खास डिझाइन केलेल्या वस्तूंचे महत्त्व अधोरेखित केले.

संस्थेचे मा. जे. आर. मंत्री व अनिल गावडे यांनी संस्थेचे कार्य व उद्दिष्टे सविस्तर मांडले

या कार्यक्रमास अनेक मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मा. डॉ. लतिका नरवडे मॅडम यांची उपस्थिती लाभली.





पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील संस्थेत आयोजित दिव्यांग साहित्य वाटप कार्यक्रमात सहभागी झालेल्या अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात स्वावलंबनाची नवी आशा निर्माण झाली.

या कार्यक्रमात श्री. विष्णू वारकरी यांना चार्जिंग सायकल, तर कु. ज्योती येवलेकर यांना तीन चाकी सायकल देण्यात आली. यासोबतच अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना विशेष चालण्याचे बूट वितरित करण्यात आले.

हे साहित्य लाभार्थ्यांच्या दैनंदिन जगण्यात नवी ऊर्जा, आत्मविश्वास आणि स्वतंत्रता घेऊन आले. चेहऱ्यावर झळकणारे आनंदाचे हास्य आणि डोळ्यांतील स्वप्नांची चमक हेच या उपक्रमाचे यश ठरले.
ही मदत केवळ साधनांची नव्हे, तर त्यांच्या आयुष्यातील नवी दिशा, नवा प्रकाश आणि नवा विश्वास ठरली आहे.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM Highlights

www.anamprem.org



अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी श्री क्षेत्र लिंगतीर्थ, इसळक येथील हरिहर वारकरी शिक्षण संस्थेला भेट दिली.

या भेटीचा उद्देश वारकरी परंपरेतील विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध, साधे व श्रमप्रधान जीवन जवळून अनुभवणे हा होता. माधुकरी मागण्याची पद्धत, साधना व शिक्षणाचा समन्वय याचे दर्शन आपल्या विद्यार्थ्यांना घडले.

या भेटीमुळे स्वावलंबन, शिस्त, परंपरेचे मूल्य आणि कष्टाचे महत्त्व समजून घेण्याची प्रेरणा दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळाली.

संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. मल्लिनाथ सूर्यवंशी महाराज व त्यांच्या सहकाऱ्यांनी आत्मीयतेने मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

ही भेट विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामाजिक विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरली.



२६ जुलै रोजी अनामप्रेम – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे जून महिन्याची आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या बैठकीत संस्थेचे सर्व प्रकल्प प्रमुख व विभाग प्रमुखांनी जून महिन्यात राबवलेल्या उपक्रमांची प्रेझेंटेशनद्वारे सविस्तर माहिती दिली. प्रकल्पातील आव्हाने, अडचणी आणि त्यावरील उपाययोजना यावर सविस्तर चर्चा झाली.

या वेळी संस्थेचे सचिव मा. अनिल गावडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत समस्या सोडवण्यासाठी उपाययोजनांचा आलेख समोर ठेवला. तसेच संस्थेचे संचालक मा. अभय रायकवाड यांनीही धोरणात्मक सूचनांनी सर्वांना प्रेरणा दिली.

संस्थेच्या गुणवत्तापूर्ण सेवाभावना, नियोजनबद्ध कार्यपद्धती व सातत्यपूर्ण प्रयत्नांची ही बैठक एक महत्त्वपूर्ण ठरली.



"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!" ही सिंहगर्जना करणारे लोकमान्य टिळक हे थोर स्वातंत्र्यसेनानी, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक होते.

त्यांनी स्वराज्याची संकल्पना लोकांपर्यंत पोहोचवली, गणेशोत्सव व शिवजयंती सारख्या सार्वजनिक उत्सवांद्वारे सामाजिक एकतेला चालना दिली आणि 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांतून जनजागृती केली.



"ट्रायबॅक सेशन" हे विशेष प्रशिक्षण सत्र दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि व्यक्तिमत्व विकासासाठी घेण्यात येते.

हे प्रशिक्षण घेण्यासाठी गौरंग अभिनव शाळेच्या कोतकर मॅडम यांनी स्नेहालय संस्थेला भेट दिली, त्यांनी या उपक्रमाचे स्वरूप समजून घेतल्यामुळे ते शाळेतील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM
# MARATHWADA PROJECT

JULY - 2025



## मान्यवरांच्या संस्था भेटी -

इनर व्हील क्लब ऑफ औरंगाबाद लोटस यांच्या प्रेसिडेंट सौ. सुनीता ताई बागडे व आय.पी.पी. सौ. वैशाली ताई घाडगे यांच्याकडून आवश्यक किराणा साहित्याचा पुरवठा करून संस्थेस सहकार्य केले. जून महिन्यात सौ. बागडे व सौ. वैशाली ताई यांनी प्रत्यक्ष येऊन सामग्री सुपूर्द केली. त्यांच्या या मदतीबद्दल मन:पूर्वक आभार.

निवृत्त राजपत्रित अधिकारी श्रीयुत देवीदासजी षटकार (जोगर्स पार्क सदस्य) व त्यांची कन्या सुश्री प्राची षटकार, प्राध्यापक MIT College of Engineering यांनी संस्थेला भेट देऊन सविस्तर माहिती घेतली. संस्थेला मदत करण्याबाबत त्यांनी सकारात्मक चर्चा केली.






प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे सदस्य श्रीयुत दत्तात्रय गोविंदराव आढे यांनी अनामप्रेमला देणगी दिली. त्यांच्या या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार..



चार्टर्ड अकाउंटंट श्रीयुत राजेंद्रजी झंवर यांनी अनामप्रेमला उपयुक्त मॉनिटर व CPU प्रदान केले. यापूर्वीही त्यांच्या कडून दोन चालू स्थितीतील संगणक संच प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या सततच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार..




निवृत्त राजपत्रित अधिकारी श्रीयुत देवीदासजी षटकार त्यांच्या पत्नी सौ. सुशीला, कन्या प्रा. प्राची व नातू आयान्श यांच्यासमवेत पुन्हा भेट देऊन संस्थेला देणगी दिली. त्यांच्या या सहकार्याबद्दल अनामप्रेम परिवाराकडून मन:पूर्वक आभार.





Scanned with OKEN Scanner




**शासकीय तंत्रनिकेतन, पुणे – वसतिगृह व GPP ग्रुप यांच्या वतीने आयोजित चतुर्थ स्नेहसंमेलन 2025 मध्ये अनामप्रेम परिवारास सन्माननीय पाहुणे म्हणून सहभागी करून घेण्यात आले.**

**सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प टीमचा पारंपरिक फेटा व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.**

**कार्यक्रमात संस्थेला वॉटर फिल्टर भेट देण्यात आला, ज्याचा उपयोग संस्थेतील विद्यार्थी व लाभार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यासाठी होणार आहे.**

**"गेट-टुगेदर" संकल्पनेतून सामाजिक व भावनिक बंध अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.**



**अनामप्रेम संस्थेच्या उद्योगभवनात क्रॉक्स मशीनचे उद्घाटन करून दिव्यांगांसाठी रोजगाराची नवी दिशा सुरू करण्यात आली.**

**या नवीन उपक्रमातून १० दिव्यांग युवक-युवतींना कामाच्या संधी मिळणार असून, त्यांना स्वावलंबन व आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार आहे.**

**यापूर्वी संस्थेच्या उद्योगभवनात नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड व हवाई चप्पल निर्मितीचे प्रशिक्षण यशस्वीरित्या राबवले गेले असून, अनेक दिव्यांगांनी त्याद्वारे स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे.**

**ग्रामीण भागातील महिलांनी सॅनिटरी पॅडचा वापर करावा यासाठी संस्थेतर्फे जनजागृती करण्यात येणार असून अशा महिलांना कमी दरात पॅडचे वाटप केले जाणार आहे.**



Scanned with OKEN Scanner



अनामप्रेम संस्था – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, नोबेल सेवा आश्रम येथे "एक पेड माँ के नाम" या उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी विविध झाडांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश दिला.






स्नेह मेळावा • 'हरदिन'च्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात सहाय्यक निरीक्षक प्रल्हाद गीते यांचे प्रतिपादन

# शरीर ही खरी धनसंपदा, व्यायामाने निरोगी राहून जगता येते आनंदी जीवन

प्रतिनिधी | अहिल्यानगर

जीवनातील सर्व काही गमावलेले पुन्हा मिळवता येते. मात्र गमावलेले आरोग्य पुन्हा परत मिळत नाही. शरीर ही खरी धनसंपदा आहे. व्यायामाने निरोगी राहून आनंदी जीवन जगता येते, असे प्रतिपादन नगर तालुका पोलिस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी केले. पूर परिस्थितीमध्ये बुडणाऱ्या लोकांनी जीवाच्या आकांताने दिलेल्या हाकेला धावून त्यांचे प्राण वाचविले. हे पोलिस दलात कार्यरत असल्याने एकप्रकारे कर्तव्य पार पडल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सामाजिक क्षेत्रात योगदान देवून आरोग्य व पर्यावरण चळवळ चालवणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात मागील २५ वर्षात ग्रुपच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध

विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट व स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

मेळाव्याप्रसंगी सीए रवींद्र कटारिया, महेश पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर, संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, उद्योजक लॉरेन्स स्वामी, सीडी देशमुख लॉ कॉलेजचे

वर्षांपासून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून आरोग्य चळवळ चालविण्यात येत आहे. ग्रुपचे पाचशेपेक्षा जास्त सदस्य असून, ते आरोग्य, पर्यावरण चळवळीबरोबरच

## विद्यार्थ्यांना स्कूल बॅगसह शैक्षणिक किटचे वाटप

स्नेहालय संचलित अनामप्रेम व भीमा गौतमी विद्यार्थिनी आश्रम शाळेतील विद्यार्थी, भिंगार हायस्कूल व मायादेवी ॲबट विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करून स्कूल बॅगसह शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले.

आहे. दररोज सुंदर व आनंदी पहाट ग्रुपच्या सदस्यांच्या माध्यमातून उगवते. ग्रुपच्या स्मरणिकेतून मागील २५ वर्षांचे कार्य समाजापुढे येणार आहे.

उपस्थित सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त करून मागील २५ वर्षांतील ग्रुपच्या माध्यमातून आलेले अनुभव सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रांजली सपकाळ, वंदना मेहेत्रे, उषा ठोकळ, लताबाई सपकाळ, यशोदा झावरे,



13 जुलै रोजी संगमनेर येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, जिल्हा पुनर्वसन केंद्र, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय व जिल्हा रुग्णालय अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रिम हातपाय व कॅलिपर्स वाटप शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात 100+ नागरिकांनी सहभाग घेतला, तसेच अनामप्रेम व Youth for Jobs उपक्रमासाठी 20 अस्थिव्यंग विद्यार्थ्यांची नावनोंदणी करण्यात आली.







अनामप्रेम कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उत्पादनांचे विक्री स्टॉल विविध ठिकाणी लावण्यात आले. या उपक्रमातून संस्थेतील दिव्यांग मुलांना मार्केटिंगचा अनुभव, आत्मविश्वास आणि आर्थिक सक्षमीकरण लाभु शकेल. हा उपक्रम दिव्यांगांच्या कौशल्यांना व्यावसायिक संधी देणारा आणि आत्मनिर्भर तिकडे नेणारा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.



Scanned with OKEN Scanner







अनामप्रेम संचालित सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प व हिम्मतभवन येथे पारंपरिक व भक्तिभावाने आषाढी वारी दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत भजन, कीर्तन, अभंग गायन आणि फुगड्या घालत 'विठ्ठल-विठ्ठल'चा गजर करत वातावरण पंढरपूरमय केले. या माध्यमातून मुलांमध्ये भक्ती, संस्कार, एकात्मता आणि संघभावना जोपासण्याचा सुंदर प्रयत्न संस्थेने केला.

कार्यक्रमात मान्यवरांची उपस्थिती लाभली असून, संपूर्ण परिसर अध्यात्मिक आनंदात न्हालेला दिसून आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, कार्यकर्ते व सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.



दत्त मंदिर ट्रस्ट येथील महिला गटाने संस्थेला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांना संस्थेतील प्रकल्पात राबवत असलेल्या उपक्रमाची सविस्तर माहिती देण्यात आली.



**आळंदी येथे झालेल्या स्पायनल कॉर्ड इंज्युरी मेळाव्यात विविध केंद्रांतील रुग्णांना मोफत Botox इंजेक्शन, आवश्यक वैद्यकीय साहित्य आणि माहिती देण्यात आली. बेंगळुरु येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित राहून उपचार केले.**

**खेळांमध्ये रस असणाऱ्या रुग्णांना प्रोत्साहन देत, खेळासाठी मदतीचे साहित्यही वितरित करण्यात आले. अनामप्रेमच्या स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटरचे रुग्ण गणेश बावस्कर अशोक जोशी व राजेंद्र राऊत यांनीही यात सहभाग नोंदवत प्रेरणादायक भूमिका बजावली.**
**हा मेळावा स्पायनल कॉर्ड इंजुरी रुग्णांसाठी वैद्यकीय मदती सोबतच मानसिक आधार व सकारात्मक ऊर्जा देणारा ठरला.**



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM - Visitors

















## श्रम ही श्रीराम हमारा







**घरपोहच किराणा किट योजनेअंतर्गत नगर तालुक्यातील गरजू दिव्यांगांना किराणा किटची मदत.**




Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम - आधारग्राम

## यशवंत प्रकल्प स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटर

**JULY - 2025**






**अनामप्रेम यशवंत प्रकल्प - स्पायनल कॉर्ड इंजुरी पुनर्वसन केंद्रात सध्या 5 पेशंट उपचार घेत आहेत.**

**अनामप्रेम नोकरी प्रशिक्षण केंद्राची यशस्वी कामगिरी..!**
**जुलै महिन्यात Y4J प्रशिक्षण केंद्रामार्फत एकूण 22 दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून पुणे, बारामती व छत्रपती संभाजीनगर येथे नोकरी मिळून देण्यास अनामप्रेम टीमला यश मिळाले आहे.**






Scanned with OKEN Scanner

# SHATRUGHNA

## जिद्दीने प्रकाशाकडे वाटचाल - अंधत्वावर मात करत साकारलेले यश..

### शत्रुघ्न विलास घाडगे



अंधार कितीही घनदाट असला, तरी दिव्याच्या झळाळीपुढे त्याचा टिकाव लागत नाही.

ही उक्ती खरी करणारं एक उत्तम उदाहरण म्हणजे – शत्रुघ्न विलास घाडगे याची आयुष्यगाथा.

अंधारातून प्रकाशाकडे प्रवास

एका चुकीच्या उपचारामुळे कायमचा दृष्टीहीन झालेला शत्रुघ्न.... नियतीचे अनेक प्रहार सहन करत आता यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करत आहे. त्याची ही वाटचाल अशा प्रत्येकासाठी दीपस्तंभ आहे, ज्याच्या आयुष्यात अंधार आहे – प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष.



बालपण –
एका अंधाराची सुरुवात

17 जानेवारी 1996 रोजी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील हातीद या छोट्याशा खेडेगावात शत्रुघ्न याचा जन्म झाला. जन्मानंतर काही महिन्यांतच त्याच्या डोळ्यांना त्रास जाणवू लागला. त्याच्या पालकांनी त्याला जवळच्या दवाखान्यात नेले. परंतु त्याचे दुर्दैव असे की, या उपचारामुळे त्याची दृष्टी कायमची गेली. ज्या वयात मूल फक्त आईवडिलांच्या कुशीत असायला हवं, त्या वयात शत्रुघ्न अंधत्वाच्या अंधारात फेकला गेला.



वडिलांचे छत्र हरपले...
शत्रुघ्न अवघ्या एका वर्षाचा असतानाच त्याच्या वडिलांना कावीळ झाली आणि त्यातच त्यांचे निधन झाले. लहानगा शत्रुघ्न आणि त्याच्या दोन बहिणींच्या जबाबदारीचा डोंगर त्याची आई – कमलताई – यांच्या शिरावर पडला.



Scanned with OKEN Scanner

आईचा आधारही हिरावला

आई कमलताई मोलमजुरी करुन मुलांचं पालनपोषण करत कसेबसे घर चालवत होती. पण नियतीने तिच्यावरही क्रूर घाव घातला. शत्रुघ्न इयत्ता दुसरीत असतानाच आईचंही आजारामुळे निधन झालं. वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी आई-वडिलांशिवाय पोरका झालेला हा मुलगा आयुष्याच्या खोल दुःखद गर्तेत लोटला गेला.

शिक्षणासाठी अविरत संघर्ष

आई वडिलांच्या अकाली निधनामुळे निराधार झालेला शत्रुघ्न काही काळ चुलती व आजीकडे राहत होता. परंतु त्यांचीही परिस्थिती बेताचीच असल्याने आणि शत्रुघ्न पूर्णपणे अंध असल्याने त्यांच्याही पालनपोषणाला मर्यादा पडल्या. आणि अखेर पुण्यातील "जनसेवा फाउंडेशन – कात्रज" येथे त्याचे पुनर्वसन झाले. ही संस्था अंधांसाठी नव्हती त्यामुळे त्या संस्थेच्या तत्कालीन सचिव कैलासताई पटेल यांनी सातत्याने अंध मुलासाठी योग्य संस्थेचा शोध घेतला आणि त्यातून समोर आली – अहिल्यानगर जिल्ह्यातील “अनामप्रेम संस्था”.

अनामप्रेमने दिला नवा श्वास

22 एप्रिल 2018 रोजी अनामप्रेम संस्थेत दाखल झालेल्या शत्रुघ्नसाठी हे ठिकाण एक आशेचा नवा किरण ठरले. इथे त्याने सर्वप्रथम इयत्ता 10 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. 10 वी पर्यंतचा शिक्षणाचा एक टप्पा पूर्ण झाल्यावर त्याने पुढील शिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार त्याने माणिकताई करंदीकर महाविद्यालयातून बारावी पर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

कणखर मनोबल

आता शत्रुघ्नमध्ये एक नवा आत्मविश्वास संचारला होता. शिक्षणाबरोबरच स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा निर्धार बाळगून, शत्रुघ्न याने स्वाधार दिव्यांग प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र, अलिबाग येथून एक्यूप्रेशर व मसाज थेरपीचा 6 महिन्यांचा कोर्स नवीन कौशल्य आत्मसात करुन पूर्ण केला.

स्वतंत्र अस्तित्वाची जिद्द

आत्मनिर्भर झालेला शत्रुघ्न आज इसळक, अहिल्यानगर येथील अनामप्रेम स्पाइनल कॉर्ड इंज्युरी रिहॅब सेंटर, यशवंत प्रकल्प, आधारग्राम येथील स्पायनल कॉर्ड इंजुरी झालेल्या रुग्णांना मसाज थेरपी देऊन आधार देत आहे. दृष्टी नसतानाही आमचा हा मसाजथेरपिस्ट आपल्या जादुई हातांनी अंथरुणावर खिळून असलेल्या रुग्णांना उपचार देऊन त्यांना जीवनात उभे राहण्यासाठी आपला खारीचा वाटा उचलत आहे. त्याच्या स्पर्शात केवळ कौशल्य नाही, तर एक संवेदनशील आत्मा आहे.

प्रेरणास्तंभ

शत्रुघ्न घाडगे यांचं आयुष्य ही फक्त यशोगाथा नाही – तर ती एक प्रेरणादायी चळवळ आहे. ज्या मुलाला नियतीने अंधत्व, अनाथत्व आणि उपेक्षेच्या गर्तेत टाकलं, त्याच मुलाने स्वतःला समाजासाठी योगदान देणारा एक दीपस्तंभ बनविले. ही यशोगाथा हे देखील सांगून जाते की – आयुष्यात अनेक संकटं येतात, परंतु तुमच्याकडे आत्मविश्वासाची छत्री असेल, तर कोणतंही वादळ थोपवता येतं.

समाप्ती नव्हे, ही तर सुरुवात आहे..!

शत्रुघ्न आजही थांबलेला नाही. त्याला त्याच्यासारख्या इतर दिव्यांगांसाठी अधिक काय करता येईल, यासाठी तो सतत प्रयत्नशील आहे. त्यांचं स्वप्न आहे की, एक दिवस त्याच स्वतःचं स्वतंत्र मसाज क्लिनिक सुरु करुन इतर अंधांसाठी रोजगारनिर्मिती करावी.

शब्दात मावणार नाही अशी यशोगाथा

शत्रुघ्न घाडगे याने अनेक संकटे झेलून केवळ अंधत्वावरच मात केली नाही तर, त्याने प्रतिकूलतेवर विजय मिळवला आहे. ही गोष्ट समाजातील प्रत्येकासाठी एक जिवंत उदाहरण आहे की – "अंधार कितीही गडद असला, तरी जर मनात आशेचा दिवा तेवत असेल, तर प्रकाशाचा मार्ग नक्कीच सापडतो.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
# UDYOG BHAVAN

# Anamprem Products




## 1. Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## 2.Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!








## 3. Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.
हे तूप केवळ दर्जेदारच नाही, तर संस्थेच्या सेवाभावी कार्यासही मदतीचे हात देणारे आहे.
कृपया हे तूप खरेदी करून सेवेसोबत स्वादालाही साथ द्या.!



## 4. Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## 5. Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांगनिर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner

# दान नको संधी हवी..!
# अनामप्रेम संगीत मंच ऑर्केस्ट्रा



**दिव्यांग कलाकारांच्या कलागुणांना वाव देणारी सुरांची आगळीवेगळी मेजवानी..!**
**गेल्या 18 वर्षांपासून अंध, अपंग, मूकबधिर व अस्थिव्यंग बांधवांच्या शिक्षण व पुनर्वसनासाठी कार्यरत अनामप्रेम संस्था घेऊन येत आहे सुरांची रंगतदार मैफल.**

**सादरीकरण – चित्रपट गीते, भक्तिगीते, देवीगीते, लोकगीते, भावगीते व देशभक्तीपर गीते.**
**विविध उत्सव,मंगलकार्य, विवाहसोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम व सामाजिक उपक्रम.**

**आपल्या परिसरात ऑर्केस्ट्रा आयोजित करून दिव्यांग कलाकारांना प्रोत्साहन द्या व आपल्या कार्यक्रमाला संस्मरणीय बनवा!**

**नोंदणी व संपर्क –**
**अमृत भुसारी – 7350013847**
**सौदागर लोंढे – 9764176937**

# जाहीर आवाहन

## जाहीर आवाहन

अनामप्रेम

### दिव्यांग क्षेत्रातील समर्पित नाव... अनामप्रेम

**अनामप्रेम** संस्था गेली २० वर्ष महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांच्या शिक्षण, पुनर्वसन, व्यवसाय प्रशिक्षण व रोजगार निर्मिती करिता समर्पित कार्य करत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर (गांधी मैदान), निंबळक व इसळक गाव, धनकवडी-पुणे आणि गारखेडा परिसर-छ. संभाजीनगर येथील संस्थेच्या अधिकृत प्रकल्पांव्यतिरिक्त ईतर कुठेही, कोणत्याही नावाने किंवा स्वरूपात अनामप्रेमचे प्रकल्प चालविले जात नाहीत.

परंतु गेल्या काही दिवसांपासून असे निदर्शनास आले आहे की, **अनामप्रेम** संस्थेच्या नावाचा गैरवापर करत व दात्यांची दिशाभूल करून संभ्रम निर्माण करत काही विघ्नसंतोषी व्यक्ति देणगी संकलन किंवा वस्तुरूप मदत गोळा करत आहेत. यामुळे अनामप्रेमच्या सन्मानानीय देणगीदारांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील बाबी लक्षात घेता,

**अनामप्रेम संस्थेच्या सर्व हितचिंतक, देणगीदार व स्वयंसेवकांना नम्र आवाहन करण्यात येते की**, कृपया आर्थिक, वस्तुरूप तसेच इतर सर्व प्रकारची मदत देण्यासाठी अनामप्रेम संस्थेच्या अधिकृत कार्यकर्त्यांशीच संपर्क करावा. संस्थेचे अधिकृत संपर्क क्रमांक खालील प्रमाणे आहेत.

आपल्या विश्वासास पात्र राहणं, हेच आमचं खऱ्या अर्थानं यश आहे.
आपली साथ आणि जागरूकता हीच फसवणूक थांबवण्याची खरी शक्ती आहे.

**हिम्मतभवन वसतिगृह (अहिल्यानगर)**
9011004576, 7350013806, 9011004941

**अनामप्रेम वसतिगृह, पुणे**
9011750022

**अनामप्रेम वसतिगृह, छ. संभाजीनगर**
9011750035

**आधारग्राम स्पायनल कॉर्ड इंजुरी, सेंटर,निंबळक**
7350013803

**सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक, (अहिल्यानगर)**
7350013805, 7350517778, 9422054956

इंजि.अजित माने (अध्यक्ष - अनामप्रेम) श्री.अनिल गावडे (सचिव - अनामप्रेम)

info@anamprem.org
admin@anamprem.org
www.anamprem.org

**अनामप्रेम परिवार**
अनामप्रेम भवन, गांधी मैदान,
अहिल्यानगर - ४१४००१

/ANAMPREM

YOU TUBE INSTAGRAM FACEBOOK

@ANAMPREM_2005

## ANAMPREM CONTACT & BANK DETAILS

- **Himmat Bhavan Project** - 7350013806 , 9011004576
- **S.J Gram Project** - 7350517778 , 9011670123
- **Marathwada Project.** - 9921509199 , 9011750035
- **Anamprem Pune Hostel.** - 9422307116 , 9011750022

| | |
|---|---|
| बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM
10252110@cbin

हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.

/ANAMPREM

Scanned with OKEN Scanner